श्रीशंकराचार्यांचा मुकांस उपदेश

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा० वा०
दा. क. १००९८



मोरेश्वर त्र्यंबक जोशी

तन्मे मनः शिवसङ्कल्पमस्तु ।

श्रीशंकराचार्यांचा मुलांस उपदेश

[श्रीमच्छङ्कराचार्यविरचित-साधनपञ्चकस्तोत्रस्थ ।]

लेखक

मोरेश्वर त्र्यंबक जोशी (येळंबकर)

काव्य-स्मृतितीर्थ, एस्. टी. सी.

पुरस्कार

पण्डित **विनायकशास्त्री टिल्लू**, एम्. ए.

व्याकरणाचार्य, धर्मशास्त्र-वेदान्तशास्त्री, मीमांसातीर्थ,
सेवानिवृत्त आचार्य, सरकारी संस्कृत महाविद्यालय, इंदूर

कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई २

मूल्य पन्नास नवे पैसे

अनुक्रम 33
विभाग वा.वा.
क्रमांक 30
नों. दि.

©
कर्नाटक
प्रकाशन
संस्था

पहिली आवृत्ति
विजयादशमी, १८८४
८ ऑक्टोबर, १९६२

Printed by
B. G. Dhawale
at the Karnatak
Printing Press
& published by him
for the Karnatak
Publishing House
Karnatak House
Chira Bazar, Bombay 2

आमच्या
बंधूंचीं
मुलें
चि. त्र्यंबक
दत्तात्रेय
नरेन्द्र
सुधीर
वासुदेव
व
जगदीश
ह्यांना
ज्ञानप्राप्तीसाठीं
सहर्ष
नि
साशीर्वाद
समर्पण

— काका

मुलांनो,

परमपूज्य आद्य श्रीशंकराचार्यांनीं अनेक स्तोत्रें लिहिलीं आहेत. त्यांत अतिशय लहान व अर्थगांभीर्यानें भरलेलें हें सुंदर स्तोत्र आहे. ह्यासाठीं सत्तांधता, पक्षांधता, आळस, स्वार्थ, मत्सर, कर्तव्यशून्यता, इत्यादि गोष्टींकडे दुर्लक्ष करून आपल्या विजयासाठीं, मनःकामना पूर्ण होण्यासाठीं, धर्मसेवा, समाजसेवा व राष्ट्रोद्धार ह्याकरितां ह्या स्तोत्राचा नित्य पाठ करा. यथामति अर्थगांभीर्याचाही विचार करा व आपला उत्कर्ष करून घ्या, हेंच आचार्यांचें म्हणणें यथामति मीं प्रतिपादन केलें आहे. हें सांगण्याचा माझा अधिकार नाहीं, पण 'काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें। परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥'

ॐ तत्सत्।

पुरस्कार

सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञानाचे प्रवर्तक जगद्गुरु आद्य श्रीशंकराचार्य ह्यांचा " **ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः।**"–हा सिद्धान्त अत्यंत सत्य, शिव व सुंदर असला तरी अबोध बालमनाला त्याचा बोध व्हावा कसा? आत्यन्तिक निवृत्ति हा धर्म जरी सर्वश्रेष्ठ असला तरी क्रमाक्रमानेंच त्याचा अधिकार येईल. अशा स्थितींत श्रीमदाचार्यांच्या सागरगंभीर अशा वाङ्मयांतून साधारण अधिकाऱ्याच्या उच्छृंखल प्रवृत्तीला आळा घालून त्याला निवृत्त्य-भिमुख करण्यासाठीं ह्या प्रसिद्ध श्लोकपञ्चकाचें प्रवृत्तिपर विवेचन एकदा विद्यार्थी-गणासमोर केलें होतें. चि. मोरेश्वर जोशींसारख्या चिकित्सक बुद्धीच्या शिष्यांच्या जिज्ञासा पुरवितांना असे अनेक प्रयत्न होत होते. प्राचीन शास्त्रांच्या रहस्याकडे जनसाधारणदृष्टींतून पाहाण्याची जी सवय होती तिचाच हा एक परिणाम आहे. मध्यभारताच्या जनसेवा आयोगाचे (Public Service Commission) भूतपूर्व अध्यक्ष श्री. द. वि. रेगे, I. C. S. ह्यांच्या चि. कुमार विजय ह्याच्या उपनयनप्रसंगीं त्यांच्याकडून मला प्रेमाचें निमंत्रण आलें असतां बटूस खाऊ (भिक्षा) काय द्यावा ह्या विचारांत वरील विवेचन स्मरणांत आलें व त्याचें चटकन् समवृत्त रूपान्तर करून तें बटूस खाऊ म्हणून पाठविलें. श्री. रेगेदम्पतींनीं त्याचा अहेराच्या रूपानें सप्रेम स्वीकार करून मला खरोखरच ऋणी करून ठेवलें. चि. मोरेश्वर जोशी ह्यांच्या अनुवादाबरोबर तेंही प्रकाशित होत आहे. चि. जोशी ह्यांनीं विद्यार्थीदशेंतील सांठवून ठेवलेल्या अशा सत्त्वरत्नांची ही भाषान्तराच्या रूपानें गुंफलेली माळ प्रिय भारताच्या भावी नागरिकास खरोखर भूषणावहच होईल, असा विश्वास आहे. इतक्या वर्षांनंतर कां होईना, चि. मोरेश्वर जोशी ह्यांचा हें गुरु (ऋषि) ऋण फेडण्याचा हा उपक्रम पाहून परम कौतुक वाटतें. त्यांच्या हातून यापुढेंही अशीच धर्मसेवा वारंवार घडावी असा आशीर्वाद त्यांच्या आग्रहाप्रमाणें अमर भारतींतच देतों.

निवृत्त्याभिमुखी धर्म्या प्रवृत्तिः प्रथमं मता ।
मत्वा जगद्गुरुरिदं प्राह सोपानपञ्चकम् ॥ १ ॥
ज्ञानेशादिप्रियगिरा मयूरेशोपबृंहितः ।
अनुवादस्तदीयोऽयं तनोति किल कौतुकम् ॥ २ ॥
यत्नेनानेन कुशल आरोहन्नुन्नतेः पदम् ।
नरो नारायणो भूयात् यशो विन्दतु लेखकः ॥ ३ ॥

ऋषिपंचमी, शके १८८४,
२० खातीपुरा, इंदूर (म. प्र.)

विनायकशास्त्री टिल्लू (विनयः)

श्री. **पांडुरंग वासुदेव बुरकुले**, बी. ए., बी. टी.,
प्रिन्सिपाल, महात्मा गांधी हायस्कूल, इगतपुरी, ह्यांचा

अभिप्राय

श्री. मोरेश्वर त्र्यंबक जोशी हे महात्मा गांधी हायस्कूल, इगतपुरी, येथें अनुभवी तज्ज्ञ शिक्षक आहेत. त्यांनीं श्रीशंकराचार्यांचा "मुलांस उपदेश" हा लहानसा ग्रंथ लहान कुमार–कुमारिकांकरितां उद्बोधक होईल असा लिहिला आहे. ग्रंथाची भाषा सुगम व अर्थबोधक आहे. लेखकानें केलेलें निवेदन सोप्या भाषेंत असून परिणामकारक आहे. ह्या ग्रंथाच्या पठणानें विद्यार्थ्यांच्या मनाची योग्य जडण व घडण होईल. तसेंच ह्या ग्रंथाच्या अध्ययनानें ज्ञान, नीति, शील, चारित्र्य, भारतीय संस्कृतीचे संस्कार बालमनावर होतील. त्या दृष्टीनें हा ग्रंथ विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त होईल असा निश्चित विश्वास वाटतो.

गणेशचतुर्थी,
शके १८८४

पां. वा. बुरकुले

निवेदन

सुमारें बारा वर्षांपूर्वी इंदूर येथील महाराजा होळकर संस्कृत महाविद्यालयांत मी पूर्वोत्तरमीमांसा व धर्मशास्त्र ह्या विषयांचा अभ्यास करीत असतांना गुरुवर्य पंडित विनायकशास्त्री टिल्लू ह्यांनीं मला शंकराचार्यविरचित "साधनपञ्चकस्तोत्रा" चा उपदेशात्मक अर्थ मोठ्या प्रेमानें व तन्मयतेनें सांगितला आणि कांहीं महत्त्वाचीं टांचणेंही लिहून दिलीं. तीं मला फार आवडलीं. ह्यास्तव मीं त्यांचा अभ्यास केला आणि त्या स्तोत्राचा सरळ व सुलभ मराठी भाषेंत अर्थ लिहून गुरुवर्यांना दाखविला. त्यांनीं त्यांत कांहीं सुधारणा केली व प्रकाशित करण्याचा आदेश मला दिला. त्याला आज एक तप होऊन गेलें. पण प्रकाशनरूपी हें गुरुऋण फेडण्याचा सुयोग आला नाहीं. कारण "**उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः ।**" ह्या उक्तीप्रमाणें आमचे मनोरथ अपूर्णावस्थेंत राहून गेले. सध्या मला कांहीं मुलांमुलींना, विशेषतः आमच्या पितृतुल्य ज्येष्ठ बंधु कै. दिगंबरनाना ह्यांची मुलगी कुमारी मीना जोशी हिला, हें स्तोत्र शिकविण्याचा प्रसंग वारंवार येऊं लागला. त्यामुळेंच तो पूर्वीचा संस्कार जागृत झाला. म्हणून त्या वेळीं लिहून ठेवलेल्या भावार्थांत थोडा फेरफार करून तो पुस्तकरूपानें आज आपणापुढें ठेवीत आहें. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे गुरुवर्य पंडित विनायकशास्त्री टिल्लू ह्यांचा ह्याला आशीर्वाद मिळाला व त्यांनीं तयार केलेलें "**समवृत्त सोपानपञ्चक**" ह्या पुस्तकांत प्रकाशित करण्याची संमतिही दिली. सध्या माध्यमिक शाळांतून सांस्कृतिक शिक्षण सुरू असल्यानें ह्या पुस्तकाचा निश्चितपणें उपयोग होईल अशी आमची खात्री आहे.

ह्या स्तोत्राच्या केलेल्या प्रवृत्तिपर विवरणाविषयीं मतभेद होतीलच. तथापि तो विषय बाजूस सारून यथामति केलेलें हें प्रयत्नामृत गोड करून घ्या व आई, वडील, गुरु, ईश्वर, ज्येष्ठ-श्रेष्ठ मंडळी ह्यांच्यावर विश्वास व श्रद्धा ठेवा आणि आपलें अमूल्य जीवन उज्ज्वल करून घ्या. इतकेंच सांगून

“ गुरोरधीतं गुरवे निवेदितम् ” ह्या उक्तीप्रमाणें हें निवेदनरूपी सुमन गुरुचरणारविंदीं मोठ्या भक्तियुक्त अंतःकरणानें समर्पण करतों. श्री. मो. धों. धोपेश्वरकर ह्यांच्या सूक्ष्म व चिकित्सक ज्ञानाचा लाभ मला भरपूर झाला. इगतपुरी महात्मा गांधी हायस्कूलचे प्रिन्सिपल श्री. पां. वा. बुरकुले ह्यांनीं हें पुस्तक वाचून पाहून आपलें मत व्यक्त केलें. ह्याबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहें. सिन्नर येथील सारडा विद्यालयाचे प्रिन्सिपल विद्याप्रेमी श्री. के. जी. जोशी, श्री. ह. ग. जोगळेकर व नाशिक येथील व्यासंगी पंडित ग. वि. अकोलकर ह्यांचेंही मी कृतज्ञतापूर्वक स्मरण करितों.

यदत्र सौष्ठवं किञ्चित् तद् गुरोरेव मे नहि ।
यदत्रासौष्ठवं किञ्चित् तन्ममैव गुरोर्न हि ॥

इति शम् ।

गुरुकृपाभिलाषी
मोरेश्वर त्र्यंबक जोशी

इगतपुरी,
विजयादशमी, शके १८८४

साधनपञ्चकम्

वेदो नित्यमधीयतां तदुदितं कर्मस्वनुष्ठीयतां
तेनेशस्य विधीयतामपचितिः काम्ये मतिस्त्यज्यताम् ।
पापौघः परिधूयतां भवसुखे दोषोऽनुसन्धीयताम्
आत्मेच्छा व्यवसीयतां निजगृहात्तूर्णं विनिर्गम्यताम् ॥ १ ॥
संगः सत्सु विधीयतां भगवतो भक्तिर्दृढा धीयतां
शान्त्यादिः परिचीयतां दृढतरं कर्माशु सन्त्यज्यताम् ।
सद्विद्वानुपसर्प्यतां प्रतिदिनं तत्पादुके सेव्यताम्
ब्रह्मैकाक्षरमर्थ्यतां श्रुतिशिरोवाक्यं समाकर्ण्यताम् ॥ २ ॥
वाक्यार्थश्च विचार्यतां श्रुतिशिरः पक्षः समाश्रीयताम् ।
दुस्तर्कात्सुविरम्यतां श्रुतिमतस्तर्कोऽनुसन्धीयताम् ।
ब्रह्मास्मीति विभाव्यतामहरहर्गर्वः परित्यज्यताम्
देहेऽहंमतिरुज्झ्यतां बुधजनैर्वादः परित्यज्यताम् ॥ ३ ॥
क्षुद्व्याधिश्च चिकित्स्यतां प्रतिदिनं भिक्षौषधं भुज्यताम्
स्वाद्वन्नं न तु याच्यतां विधिवशात्प्राप्तेन सन्तुष्यताम् ।
शीतोष्णादि विषह्यतां न तु वृथा वाक्यं समुच्चार्यताम्
औदासीन्यमभीप्स्यतां जनकृपानैष्ठुर्यमुत्सृज्यताम् ॥ ४ ॥
एकान्ते सुखमास्यतां परतरे चेतःसमाधीयताम्
पूर्णात्मा सुसमीक्ष्यतां जगदिदं तद्बाधितं दृश्यताम् ।
प्राक्कर्म प्रविलाप्यतां चितिबलान्नाप्युत्तरैः श्लिष्यताम्
प्रारब्धं त्विह भुज्यतामथ परब्रह्मात्मना स्थीयताम् ॥ ५ ॥

यः श्लोकपञ्चकमिदं पठते मनुष्यः
संचिन्तयत्यनुदिनं स्थिरतामुपेत्य ।
तस्याशु संसृतिदवानलतीव्रघोर-
तापः प्रशान्तिमुपयाति चितिप्रसादात् ॥ ६ ॥

इति श्रीमच्छङ्कराचार्यविरचितं साधनपञ्चकस्तोत्रं संपूर्णम् ।

३३०
मो.
३०७

सोपानपञ्चक

विद्याभ्यास सदा करा कृति तया साजेल ऐशी करा
कर्तव्यें प्रभुशीं भजा त्यजुनियां त्या निन्द्य कर्मान्तरा ।
व्हावें निर्मल मानस क्षण सुखामाजीं न सक्ती धरा
आत्मेच्छाबल वाढवा अतिगृहासक्तीस दूरी करा ॥ १ ॥
सद्वस्तूवरि आवडी मनिं धरा भक्ती प्रभूची करा
बाणो सद्गुण अंगिं बंधक अशा कृत्या न द्या आसरा ।
वंदा पंडित संत सेवुनि तयां ते आपुलेसे करा
मागा शाश्वत ज्ञान सारवचनें सांठा तयांचा करा ॥ २ ॥
सारासार विचारणीं रत रहा सत्पक्षिं घ्या आसरा
टाका दूर कुतर्क शास्त्रमत जो सत्तर्क तो स्वीकरा ।
आहे मी बहुथोर पामर न हें जाणा न गर्वा वरा
आस्था नश्वरिं ना धरा नच वृथा वादा बुधाशीं करा ॥ ३ ॥
क्षुत्तृष्णादि विकार योग्य शमवा भृंगापरी सांठवा
सारांशा, न च याचना निजमुखीं सन्तोष तो वागवा ।
शितोष्णादि सहावया बल वरा त्रागा न वाचें करा
सारे जाणुनि व्हा तटस्थ न करा पर्वा कुणाची जरा ॥ ४ ॥
एकान्तीं स्थिर व्हा त्यजा गलबला ध्येयाकडे लक्ष द्या
पूर्णात्मस्वरूपा पहा जगिं तयावांचूनि ना सार या ।
गेल्याचा नच हर्ष शोक, पुढती येत्या न भीती धरा
आल्या तोंड सुखेंचि देउनि करा नारायणा या नरा ॥ ५ ॥

सोपानपञ्चक असें दृढ जाणुनीयां
ठेवील जो स्थिर पदें पुढती चढायां ।
लागे तया न भवतापहि तापवील
चैतन्यदीप सगळें तम घालवील ॥ ६ ॥

— विनायकशास्त्री टिळू

प्रस्तुत लेखकाची साहित्यसेवा

१ श्रीसूक्ताचें मराठी भाषान्तर मूल्य ३७ नवे पैसे

भूमिका – पं. विनायकशास्त्री टिल्लू, एम्. ए., व्याकरणाचार्य

ह्यांत मूळ १६ मंत्र, त्यांच्याखालीं अन्वयार्थ, सरलार्थ व राष्ट्रीय पद्धतीनें भावार्थ दिला आहे. सर्वांनाच ह्याचा उपयोग झाला आहे.

२ वै. वा. वंकटस्वामीमहाराज ह्यांचें चरित्र, मूल्य रु. १

वारकरी संप्रदायांत बंकटस्वामींचें स्थान अनन्यसाधारण होतें. महाराष्ट्रांत ह्यांचा शिष्यपरिवार फारच मोठा आहे. त्यांना, किंबहुना सर्वच मराठी वाचकांना हें पुस्तक संग्राह्य आहे. प्रस्तावना : सोनोपंत दांडेकर.

३ शैक्षणिक नवनीत मूल्य १-५०

हें पुस्तक एस्. टी. सी. परीक्षा व तत्सम परीक्षांस अत्यंत उपयुक्त आहे. नव्यानें शिक्षक होऊं इच्छिणाऱ्यांसाठीं अथवा नुकताच शिक्षकाचा पेशा पत्करला आहे अशा नवयुवकांसाठीं अत्यंत उपयोगी.

४ माझी जन्मभूमि (येळंबघाट)

ह्या पुस्तकांत येळंबघाट ह्या प्राचीन व ऐतिहासिक गांवाची माहिती दिली आहे. मुलांनीं आपल्या गांवाची पहाणी करून तद्विषयक निबंध कसा लिहावा हें ह्या पुस्तकावरून समजेल. प्रस्तावना : म. म. दत्तो वामन पोतदार.

अमृत – तुषार, लेखक — ग. वि. अकोलकर मूल्य रु. २

संस्कृत साहित्यांतील वेंचक सुभाषितें व रघुवंश, शाकुन्तल, उत्तररामचरित, इत्यादि नाटकांतील भावपूर्ण श्लोक ह्यांचा ललितमधुर असा रसास्वाद.

ॐ

श्रीशंकराचार्यांचा मुलांस उपदेश

वेदो नित्यमधीयताम्

विद्याभ्यास सदा करा

विद् धातूपासून वेद शब्द बनला आहे. वेद शब्दाचा अर्थ ज्ञान. अध्ययन म्हणजे गुरूपासून मिळविणें. योग्य गुरूपासून नेहमीं पवित्र ज्ञान मिळवीत जा. जगांत ज्ञानाशिवाय दुसरी पवित्र वस्तु नाहीं, असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे. म्हणून ज्ञान संपादन करणें हें मुलांचें आद्य व मंगल कर्तव्य आहे.

तदुदितं कर्मस्वनुष्ठीयताम्

कृति तया साजेल ऐशी करा

मिळविलेल्या ज्ञानाचा प्रत्यक्ष व्यवहारांत योग्य उपयोग करा आणि कोणतेंही कार्य अंधश्रद्धेनें न करतां समजून करा व कसोशीनें पार पाडा.

तेनेशस्य विधीयतामपचितिः

कर्तव्यें प्रभुशीं भजा

जगाचा नियंता जो परमेश्वर त्याची आपल्या ज्ञानयुक्त कर्तव्यपालनानें नित्य उपासना (पूजा) करीत जा. ईश्वराच्या पूजेमुळें मन शुद्ध होत. शुद्ध मनाचा माणूस सहसा कुकर्माकडे जात नाहीं. ह्यासाठींच नित्यनियमानें ईश्वराची पूजा कर्तव्यरूपानें करण्याचा उपदेश केला आहे.

काम्ये मतिस्त्यज्यताम्

त्यजुनि द्या त्या निन्द्य कर्मान्तरा

हाव आणि लोभ वाढवतील अशा कर्मापासून दूर राहा. कारण लोभ सर्व अनर्थाचें मूळ आहे. कर्म केवळ कर्तव्यबुद्धीनें करा. वासनेनें करूं नका.

पापौघः परिधूयताम्

व्हावें निर्मळ मानस

आपल्या हातून कळत न कळत अनेक प्रकारचीं पापें होत असतात. पापी माणसांना जगांत समाधान मिळत नाहीं. ह्यास्तव गुरूंची कायेनें, वाचेनें व शुद्ध मनानें सेवा करा. सत्कर्में आचरून पाप घालवून टाका. पवित्र व्हा. सामान्यतः पापाचे स्थूल आणि सूक्ष्म असे दोन प्रकार पडतात.

मत्सर करणें, ग्राम्य भाषण करणें, परस्त्री मातृसमान न मानणें, स्वधर्माचा व स्वराष्ट्राचा अभिमान न बाळगणें, गुरुनिंदा, वेदनिंदा, देवनिंदा, ब्राह्मणनिंदा, संतनिंदा, तीर्थनिंदा, शास्त्रनिंदा, निरर्थक वृक्षच्छेदन, परद्रव्यापहरण, ऋणअदान, अभक्ष्यभक्षण, अपेयपान, अश्राव्यश्रवण, अहिंस्यहिंसन, इत्यादि शास्त्रानें मानलेलीं पापें स्थूल आहेत. मातृ-पितृ-तिरस्कार, स्त्रीपुरुषप्रीतिभेदन, ज्येष्ठ-श्रेष्ठ मंडळीचा तिरस्कार, इत्यादिकांना सूक्ष्मपाप म्हणावें लागेल.

गुरुसेवा, जनसेवा, ईश्वरोपासना, सत्कर्माचरण, सत्य व मृदु भाषण, ज्येष्ठ-श्रेष्ठ मंडळीविषयीं नम्रताधारणा, मातृपितृ-आज्ञापालन, आरोग्य व स्वच्छता, इत्यादिकांच्या योगें सर्व पापें घालवून टाका. आरोग्य व स्वच्छता ह्यांयोगें आयुष्य वाढतें. तात्पर्य, अज्ञानतः अगर ज्ञानतः होणारें पाप ईश्वरार्पण बुद्धीनें केलेल्या कर्तव्यकर्मानें धुवून काढा.

भवसुखे दोषोऽनुसन्धीयताम् ।

क्षणसुखामाजीं न सक्ती धरा

वरवर पाहातां संसारांत सुख आहे असें सर्वसामान्य लोकांना वाटतें. परंतु संसारांत सुखापेक्षां दुःखच अधिक आहे.

" सुखात् बहुतरं दुःखं जीविते नास्ति संशयः । " " सुख पाहातां जवापाडें दुःख पर्वताएवढें । " हीं साधुसंतांचीं संस्कृत-प्राकृत वचनें संसारांत दुःख असल्याचेंच सांगत आहेत. म्हणून प्रापंचिक गोष्टींचा चिंतनानें पूर्ण विचार करा. संसारांत वरवर दिसणाऱ्या सुखाकडे पाहून भुलूं नका. त्यांत

चांगल्या गोष्टी कोणत्या आहेत व वाईट गोष्टी कोणत्या आहेत, ह्यांचा गुरूंच्या मदतीनें विचार करा. चांगल्या गोष्टींचा स्वीकार करा व वाईट गोष्टींचा तावडतोब त्याग करा.

आत्मेच्छा व्यवसीयताम्

आत्मेच्छाबळ वाढवा

स्वतःचा सुयोग्य उत्कर्ष झाला पाहिजे अशी महत्त्वाकांक्षा धरा. स्वतःच्या उत्कर्षामुळें आपल्या गांवाला, आपल्या प्रांताला, आपल्या देशाला फायदा होतो. म्हणून सुयोग्य असा उत्कर्ष करून घ्या. दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिऊं नका.

निजगृहात् तूर्णं विनिर्गम्यताम् ॥ १ ॥

अतिगृहासक्तीस दूरी करा ॥ १ ॥

अभ्यासासाठीं म्हणजे ज्ञान मिळविण्यासाठीं अन्य ठिकाणीं जाणें आवश्यक असल्यास घरांतून तावडतोब निघून जा. गुरूंच्या सान्निध्यांत राहून ज्ञानप्राप्ति होते. मनुष्य शीलवान बनतो. बहुश्रुत होतो. ह्यासाठींच आपल्या घरीं न राहातां गुरूंच्या घरीं अगर गुरुकुलांत राहून ज्ञान संपादन करा. गुरुकुलांत राहिल्यानें नियमितपणा येतो. स्वावलंबन अंगीं बाणतें. निरनिराळ्या स्वभावांची पारख होते. चांगल्या मुलांची संगति धरावी, वाईट मुलांच्या संगतींत राहूं नये, हें समजतें. चित्तशुद्धि होते. सदाचार घडतो. इतर मुलांच्या सहवासामुळें सामुदायिक रीत्या काम करण्याची चांगली सवय

लागते. सूर्योदयापूर्वी उठून स्नान करणें, व्यायाम करणें, खरें बोलणें, अशा कितीतरी चांगल्या गोष्टींची सवय गुरुकुलांत राहिल्यामुळेंच होते. अशक्य गोष्टसुद्धां शक्य करण्याची धमक अंगांत येते. सामाजिक काम करतेवेळीं आपोआपच राष्ट्रसेवा घडते. ह्यासाठींच घरकोंबडेपणाची वृत्ति टाकून आपल्या घरांतून तावडतोब बाहेर पडा, असाच आचार्यांचा आग्रह दिसतो.

सङ्गः सत्सु विधीयताम्
सद्वस्तूंवरि आवडी मनिं धरा

सज्जनांची संगति नेहमीं धरावी. चांगल्या संगतीमुळें चांगले परिणाम होतात व वाईट संगतीमुळें दुष्परिणाम घडतात. " सुसंगति सदा घडो सुजनवाक्य कानीं पडो।" असें मोरोपंतांनीं ह्याच आधारावर म्हटलें आहे.

भगवतो भक्तिर्दृढा धीयताम्
भक्ति प्रभूची करा

अभ्यासरूपी कर्तव्यें करीत असतांना भगवंताची मनोभावानें भक्ति करा. परमेश्वराची खूप भक्ति केल्यानें ज्ञान प्राप्त होतें. " भक्तेस्तु या पराकाष्ठा सैव ज्ञानं प्रकीर्तितम्।" भक्तीची जी परिसीमा तिलाच ज्ञान म्हणतात. ह्यासाठींच ज्यानें आपणांस निर्माण केलें आहे त्या परमेश्वराची कायेनें, वाचेनें, शुद्ध अन्तःकरणानें सेवा करा, म्हणजे ज्ञान प्राप्त होईल.

ईश्वरानें आपणांस नाक, कान, डोळे, हात, पाय, तोंड, जीभ, इत्यादि अवयव दिले आहेत. त्या सर्वांचा उपयोग ईश्वरभक्तीसाठींच करा. कानांनीं कीर्तन, प्रवचन, भजन, चांगलें व्याख्यान ऐका. डोळ्यांनीं ईश्वराच्या मूर्तीचें दर्शन घ्या. दोन्ही हातांनीं टाळी वाजवा, मुखानें ईश्वराचें नामस्मरण करा व सर्वांशींच गोड बोला. तात्पर्य, अभ्यास करीत असतांना भगवंताची सेवा करा असाच भाव आहे.

शान्त्यादिः परिचीयताम्

बाणो सद्गुण अंगीं

शांति, दया, अहिंसा, मार्दव, तेज, क्षमा, धैर्य, अद्रोह, शौच, इत्यादि दैवी गुणांचा परिचय करून घ्या. दैवी गुणांमुळें समाधान प्राप्त होतें. मनाची एकाग्रता म्हणजे समाधान. असा समाधानाचा अर्थ कांहीं ठिकाणीं दिला आहे.

शांति – मनांत नेहमीं शांतता ठेवणें.

दया – प्राण्यांवर दया दाखविणें.

अहिंसा – कायेनें, वाचेनें, मनानें प्राण्यांना पीडा न देणें.

मार्दव – मृदुपणा, वागण्यांत बोलण्यांत मृदुपणा धारण करणें.

तेज – प्रगल्भता, विशिष्ट सामर्थ्य.

क्षमा – सहनशीलता.

धैर्य – उत्साहीपणा, धीटपणा.

अद्रोह – मत्सर न करणें.

शौच – अन्तःशुद्धि व बहिःशुद्धि.

दृढतरं कर्माशु सन्त्यज्यताम्

बन्धक अशा कृत्या न द्या आसरा

आपल्या उत्कर्षाच्या आड येणाऱ्या वाईट गोष्टींचा ताबडतोब त्याग करा. एकदा का वाईट गोष्टींची सवय जडली कीं उत्कर्ष मुळींच होणार नाहीं. ह्यास्तव वाईट कृत्यांचा त्याग करा

सद्विद्वानुपसर्प्यताम्

वंदा पंडित संत

ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं व सुयोग्य उपदेश ऐकण्यासाठीं योग्य विद्वान्, साधुसंत ह्यांचा आश्रय घ्या. जो पाठ करतो, लिहितो, विद्वानांना कांहीं शंका विचारून समाधान करून घेतो आणि पंडितांच्या सान्निध्यांत राहातो, त्याच्या बुद्धीचा विकास प्रभातकालीन कमळाप्रमाणें होतो. मात्र जो मनुष्य विद्वान् आहे पण ज्याचें वर्तन दुष्ट आहे अशा विद्वानापासून सर्पयुक्त चंदनाच्या झाडाप्रमाणें दूर राहा.

प्रतिदिनं तत्पादुके सेव्यताम्

सेवुनि तयांतें आपुलेसें करा

दररोज नम्रतापूर्वक विद्वानांच्या चरणकमलावर आपलें मस्तक भक्तिभावानें ठेवा, म्हणजे त्यांना नमस्कार करीत जा व त्यांचा आशीर्वाद मिळवीत जा. आशीर्वादानें अशक्य गोष्ट सुद्धां शक्य होते.

"ईशो रुष्टे गुरुस्त्राता गुरौ रुष्टे न कश्चन।" ईश्वर रागावला तर गुरु रक्षण करणारा आहे, पण गुरु रागावले तर मात्र कोणीही रक्षण करणारे नाहींत. एवढी मोठी गुरूंची योग्यता आहे. म्हणूनच गुरूंच्या चरणकमलांचें दररोज वंदन करीत जा.

ब्रह्मैकाक्षरमर्थ्यताम्

मागा शाश्वत ज्ञान

ज्याच्यापासून जगाची उत्पत्ति झाली व ज्याच्यांतच हें जग विलीन होणार आहे, अशा ब्रह्माची म्हणजे परमेश्वराची ओळख करून घ्या, म्हणजे योग्य गुरूपासून ब्रह्मज्ञान करून घ्या.

मी कोण आहें, कोठून आलों, कोठें जावयाचें, पूर्वींच्या जन्मीं मी कोण होतों, इत्यादि गोष्टींचें ज्ञान ब्रह्मज्ञानामुळेंच होतें. सर्वव्यापक आणि अविनाशी असें जें परमात्मस्वरूप त्याच्या प्राप्तीसाठीं अभिलाषा धरा. अशाश्वताच्या मागें लागूं नका. "एकेन विज्ञातेन सर्वं विज्ञातं भवति।" एका ब्रह्माचें ज्ञान झालें कीं सर्व गोष्टींचें ज्ञान आपोआपच होतें. सोन्याचें ज्ञान झालें कीं सर्व सुवर्णालंकारांचें ज्ञान सहज होतें. तद्वत् एक ब्रह्म समजलें कीं सर्वच कळतें. ह्यासाठीं अधिकारी होऊन, योग्य पात्रता आणून, ब्रह्मज्ञान समजावून घ्या.

श्रुतिशिरोवाक्यं समाकर्ण्यताम् ॥२॥

सारवचनें सांठा तयांचा करा ॥ २ ॥

"श्रवणं तु गुरोः पूर्वम्।" ह्या वचनाप्रमाणें प्रथम योग्य गुरूंच्या मुखांतून वेद, उपनिषदें, धर्मशास्त्र, भागवत, महाभारत,

रामायण, इत्यादिकांचें श्रवण करा व आपल्याला झेपेल एवढाच भाग लक्षांत ठेवा. श्रुति म्हणजे वेद. वेदवाक्य वंद्य समजा.

वाक्यार्थश्च विचार्यताम्

सारासारविचारणीं रत रहा

कोणत्याही गोष्टीचा एकदम निर्णय न करतां प्रथम विचार करा, कांहीं गोष्टी प्रथमदर्शनीं चांगल्या वाटतात, पण त्यांचा परिणाम वाईट होतो. कांहीं गोष्टी प्रथम अवघड वाटतात, परंतु त्यांचें पर्यवसान मात्र चांगलेंच होतें. ह्यासाठीं, अविचारीपणानें कोणत्याही गोष्टीचा एकदम निर्णय न घेतां पूर्ण विचार करून घ्या. प्रसंगविशेषीं आपल्याला संबंधित असलेल्या गोष्टींचा पूर्ण विचार करण्यासाठीं गुरूंचाही सल्ला घ्या.

श्रुतिशिरःपक्षः समाधीयताम्

सत्पक्षिं घ्या आसरा

सभेंत, मित्रांच्या बरोबर अगर विद्वानांच्या बरोबर वादविवाद करण्याच्या प्रसंगीं आपला विषय नीट समजावून सांगत असतांना वेद, उपनिषदें, धर्मशास्त्र, महाभारत, भागवत, रामायण, संतांचे अभंग अशा सत्प्रमाणांचा आधार घ्या. शास्त्रीय आधाराशिवाय सभेंत सहसा बोलूं नका. सत्प्रमाणांचा आधार घेऊनच समंजसपणानें बोलावें. वेद, उपनिषदें, ज्ञानेश्वरींतील ओंव्या, संतांचे अभंग, इत्यादिकांचा आधार घेऊन स्वविषय प्रतिपादन केला तर जयप्राप्ति होते व यशोदुंदुभि चहूंकडे गाजत राहाते.

दुस्तर्कात्सुविरम्यताम्

टाका दूर कुतर्क

वादविवादाच्या वेळीं प्रतिपक्षाचा पराजय करण्यासाठीं '.नानृतात्पातकं परम् ।' हें वचन लक्षांत घेऊन खोटें बोलूं नका. कुतर्क लढवूं नका. कुतर्कामुळें अवमान होतो. आपला विजय होत नाहीं. म्हणूनच कुतर्कापासून कायमचे दूर राहा.

श्रुतिमतस्तर्कोऽनुसन्धीयताम्

शास्त्रमत जो सत्तर्क तो स्वीकरा

कोणत्याही गोष्टीचा विचार करतेवेळीं वेदशास्त्र व तदनुषंगिक ऐतिहासिक वाङ्मय ह्यांना संमत असाच तर्क करीत जा. विचार करतेवेळीं विद्वानांची बाजू नीट समजावून घेऊनच आपली बाजू मांडा.

ब्रह्मास्मीति विभाव्यताम्

आहें मी बहु थोर, पामर न हें जाणा

मी दुबळा आहें, माझ्या हातून कांहीं होणार नाहीं, असा हीनगंड मनांत न आणतां अशक्य गोष्टसुद्धां मी शक्य करून दाखवीन, कारण मी ब्रह्म म्हणजे सुविद्य आहें, असाच नित्य विचार करा व तसा प्रयत्न करा. स्वाभिमानी व्हा. " नर करणी करे तो नरका नारायण हो जाय । "

अहरहर्गर्वः परित्यज्यताम्
न गर्वा करा

क्षुद्र अभिमानापासून कायमचे दूर राहा. गर्वाचें घर नेहमींच खालीं असतें, हें लक्षांत असूं द्या. गर्वामुळें दुर्योधनाचा नाश झाला. रावण मारला गेला. ह्यासाठींच क्षुद्र अभिमानाचा विषारी सर्पाप्रमाणें त्याग करा. स्वाभिमानाचा मात्र त्याग करूं नका. स्वाभिमान बाळगणें हा गर्व नाहीं.

देहेऽहंमतिरुज्झ्यताम्
आस्था नश्वरिं ना धरा

शरीराविषयीं व्यर्थ अभिमान बाळगणाऱ्या बुद्धीचा त्याग करा. सर्वसामान्य माणसें शरीर आणि मी एकच आहें, असें समजतात. परंतु ह चुकीचें आहे. शरीर नाशिवंत आहे, म्हणजे नष्ट होणारें आहे. मी वेगळा व शरीर वेगळें. मी व शरीर एक नाहींत हें गुरूंकडून नीट समजावून घ्या.

बुधजनैः वादः परित्यज्यताम् ॥ ३ ॥
न च वृथा वादा बुधांशीं करा ॥ ३ ॥

थोर लोक, विद्वान् माणसें, साधुसंत, ज्येष्ठ-श्रेष्ठ मंडळी, गुरुजन, शास्त्री-पंडित, ह्यांच्याबरोबर आपल्या अर्धवट ज्ञानाच्या आधारावर वादविवाद करूं नका. कित्येक लोकांना आपल्या अर्धवट ज्ञानाच्या आधारावर निष्कारण वादविवाद करण्याची

वाईट सवय जडलेली असते. ह्यामुळें त्यांना फायदा तर होत नाहींच पण अपयश मात्र हातीं येतें. गुरूंपासून शुद्ध ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं नम्रता बाळगा. त्यांच्याशीं वादविवाद करीत बसूं नका. हेंच पूज्यपाद आचार्यांचें म्हणणें आहे.

क्षुद्व्याधिश्च चिकित्स्यताम्

क्षुत्तृष्णादि विकार योग्य शमवा

धर्म, अर्थ, काम व मोक्ष असे चार पुरुषार्थ आहेत. ह्या पुरुषार्थांचें शरीर हें साधन आहे. शरीर निरोगी असेल तर चार पुरुषार्थ साधतां येतील. शिवाय मनाचाही विकास होईल. ह्यासाठीं शरीरास लागणारी भूक योग्य व स्निग्ध पदार्थांनीं शमवावी आणि तहान मधुर पाण्यानें शमवावी. शरीरांत कांहीं बिघाड झाला असल्यास योग्य वैद्यापासून त्याचें निदान करवावें. नंतर औषध घ्यावें. पथ्यें सांभाळावीं.

शरीर नाशिवंत असलें तरी जिवांत जीव असेपर्यंत त्याची निगा राखलीच पाहिजे. शरीराची निगा राखल्याशिवाय आपल्या हातून कोणतेंच कार्य होणार नाहीं. म्हणून शरीरास पोषक अशी भूक व तहान ह्यांची काळजी घ्यावी.

"शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।" हें कविकुलगुरु कालिदासाचें वचन शरीराची निगा राखण्याविषयींच बोध करीत आहे.

प्रतिदिनं भिक्षौषधं भुज्यताम्

भृंगापरी सांठवा सारांश

ज्ञान व वैराग्य प्राप्त होण्यासाठीं विद्यार्थ्यांनीं दररोज भिक्षान्न सेवन करावें. ह अन्न पवित्र असतें.*भिक्षेमुळें समाजाचें ज्ञान होतें. निरनिराळ्या लोकांचा बरावाईट स्वभाव कळतो. ह्यासाठींच रामदासस्वामींनीं "ॐ भवति ह्या पक्षा सांभाळिलें पाहिजे" असें आग्रहानें म्हटलें आहे. शरीर अन्नमय आहे. म्हणून त्याला सात्त्विक आहाराची आवश्यकता आहे. ज्ञान-वैराग्यप्राप्त्यर्थ मिळालेलें भिक्षान्न सात्त्विक असतें. ह्या आहाराचा परिपाक चांगल्या रीतीन होण्यासाठीं वैद्यांच्या मदतीनें योग्य औषधी सेवन करा. भक्षण केलेल्या अन्नाचा परिपाक चांगल्या रीतीनें होणें इष्ट आहे. कारण त्यावरच भावी विकासाची इमारत अवलंबून आहे. भ्रमर ज्याप्रमाणें एकाच फुलावर आसक्ति न ठेवतां अनेक फुलांपासून मध गोळा करतो, तद्वत् मुलांनींसुद्धा प्रत्येक क्षणाला मिळेल तेथून ज्ञान संपादन करावें.

* पूर्वकाळीं पांचव्या वर्षी उपनयन होऊन मुलगा गुरुगृहीं ब्रह्मचारी-व्रतानें अध्ययनार्थ बारा वर्षे राहात असे. ह्या काळांत मधुकरी मागून तो आपला निर्वाह करी. असें मधुकरीचें अन्न सेवन करण्यांत मुळींच कमीपणा नाहीं असें आचार्यांनीं तत्कालीन विद्यार्थ्यांना उद्देशून म्हटलें आहे. आजचा काळ बदलेला आहे. गुरु, गुरुगृहें आहेत पण त्यांचें स्वरूप पूर्वीच्याहून अगदीं भिन्न. मधुकरी मागून विद्याभ्यास करणारे विद्यार्थी कांहीं कांहीं ठिकाणीं आढळतात. त्यांनीं मधुकरी मागण्यांत कमीपणा न मानतां आचार्य म्हणतात त्याप्रमाणें ती पवित्रच मानावी.

स्वाद्वन्नं न तु याच्यताम्

न च याचना

भिक्षेस जें अन्न मिळेल तें पवित्र समजून सेवन करा. स्वादिष्ट अन्नाची याचना करूं नका.

"निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु।" जें अन्न वेळेवर मिळेल त्यावरच उदरनिर्वाह करावा. मन व जीभ ताब्यांत असेल तर हें शक्य होईल. सर्व इंद्रियांत जीभ फार खोडसाळ आहे. तिच्या नादीं लागून तिचे चोजले पुरविण्यासाठीं आपला अभिमान घालवून हीन होऊं नका.

विधिवशात् प्राप्तेन सन्तुष्यताम्

निजसुखीं संतोष तो बागवा

दैवानुसार मधुकरींत जें अन्न मिळेल त्यावरच समाधान मानावें. अन्नाच्या बाबतींत विद्यार्थ्यांनीं असमाधानी कधींही राहूं नये. समाधानी वृत्ति ठेवावी आणि शुक्लपक्षांतील चंद्राच्या कलेप्रमाणें आपली विद्या दररोज वाढवावी. गुरूंच्या मर्जीनुरूप जें कांहीं मिळेल त्यावर आनंद मानावा. मनुष्यानें नेहमीं योग्य मार्गानें मिळणाऱ्या वस्तूंतच संतोष मानावा. असंतोष हा दुःखाचें मूळ आहे, हें लक्षांत ठेवावें.

शीतोष्णादि विषह्यताम्

शीतोष्णादि सहावया बळ वरा

जगांत वावरत असतांना मनुष्यांवर अनेक संकटें येतात. त्यांना सहनशक्तीच्या जोरावर तोंड द्यावें. सहनशक्ति मात्र

चांगल्या बळावर अवलंबून आहे. म्हणून व्यायामानें बळ व अभ्यासानें विवेक मिळवावा. ह्या दोन गोष्टी प्राप्त झाल्या कीं शीतोष्णादि संकटें मनुष्य आपोआपच सहन करतो.

न तु वृथा वाक्यं समुच्चार्यताम्

त्रागा न वाचें करा

सर्व प्राण्यांपेक्षां ईश्वरानें मनुष्याला वाणी हें इंद्रिय अधिक कार्यक्षम दिलें आहे, म्हणून वाटेल तसा त्याचा उपयोग करूं नका. म्हणजे निरर्थक बडबड करूं नका. योग्य तेंच सभ्यतेनें बोला. "वचस्तत्र प्रयोक्तव्यं यत्रोक्तं लभते फलम्।" ज्या ठिकाणीं उपयोग होईल अशाच ठिकाणीं वाणी खर्च करा. असत्य व कटु बोलून आपल्या योग्य काळाचा दुरुपयोग करूं नका.

औदासीन्यमभीप्स्यताम्

सारें जाणुनि व्हा तटस्थ

आपणांस न झेपणाऱ्या गोष्टींकडे तटस्थतेनें बघा. "काकदृष्टिः बकध्यानम्।" ह्या उक्तीप्रमाणें मुलांनीं अभ्यासाच्या बाबतींत मात्र लक्ष द्यावें. आपणांस न पेलणाऱ्या गोष्टी, त्या कितीही चांगल्या असल्या तरी, पात्रता येईपर्यंत तिकडे तटस्थपणानेंच बघा.

जनकृपानैष्ठुर्यमुत्सृज्यताम् ॥ ४ ॥

न करा पर्वा कुणाची जरा ॥ ४ ॥

आपलें कर्तव्य पार पाडीत असतांना "निंदोत वानोत सुनीतमंत" ह्या वचनाप्रमाणें लोकांच्या स्तुतिनिंदेकडे बघूं

नका. जनतेची कृपा व अवकृपा ह्या दोन्हीही गोष्टींकडे दुर्लक्ष करा. " तुका म्हणे जग दुतोंडी सावज " ह्या संतोक्तीप्रमाणें लोक दोन्हीकडूनही बोलतात. आपण मात्र मनाचा खंबीरपणा धरून आपलं कर्तव्य पार पाडीत जा.

एकान्ते सुखमास्यताम्

एकान्तीं स्थिर व्हा त्यजा गलबला

" घडो एकान्ताचा वास " हें संतवचन ह्याच आधारावर एकान्तवासाची महती सांगत आहे. एकान्तामुळें चिंतन चांगलें होतें, सुविचार सुचतात, अभ्यास चांगला होतो, मन स्थिर होतें. म्हणूनच एकान्तांत राहाण्याविषयीं आचार्यांनीं सुचविलें आहे. " यदिष्टं तत्सुखम् । " हें सुख एकान्तांत राहून मिळवितां येतें.

परतरे चेतः समाधीयताम्

ध्येयाकडे लक्ष द्या

आपला अभ्यास चालू असतांना अगर शाळेंत जात असतांना उगीच इकडे तिकडे बघत वेळ दवडूं नका. आपल्या ध्येयाकडेच लक्ष द्या. ध्येय दूर व अशक्य भासलें तरी तें प्रयत्नानें साध्य होतें. ध्येय नेहमींच कष्टसाध्य असतें. ह्यासाठींच आपल्या ध्येयाकडे लक्ष ठेवा. " नोच्चार्थो विफलोऽपि दूषणपदं दूष्यस्तु कामो लघुः । "

पूर्णात्मा सुसमीक्ष्यताम्

पूर्णात्मस्वरुपा पहा

ईश्वराचें दर्शन झालें पाहिजे ह्याकडे लक्ष ठेवा. जगांत विविधता आहे. तीं सारीं परमेश्वराचीं रूपें आहेत. जगाच्या बुडाशीं परमात्मा ईश्वर आहे, ह्याकडे बारकाईनें बघा. अगर तत्स्वरूप समजावून घ्या. सर्व जगांत परमात्मा भरला आहे, असें संत सांगत असतात.

जगदिदं तद्वाधितं दृश्यताम्

जगिं तयावांचूनि ना सार या

आपल्या डोळ्यांना दिसणारें नामरूपात्मक जगत् ईश्वरानें व्यापून टाकलें आहे. तत्त्वतः तें ईश्वरस्वरूपच आहे, असें वेद सांगत आहेत. "ईशावास्यमिदं सर्वम्।" असें शुक्लयजुर्वेदीय संहितेच्या चाळिसाव्या अध्यायांत म्हणजेच इशावास्योपनिषदांत म्हटलें आहे.

प्राक्कर्म प्रविलाप्यताम्

चितिबलात् नाप्युत्तरैः श्लिष्यताम्

गेल्याचा न च हर्षशोक

पुढती येत्या न भीति धरा

कांहीं माणसें पूर्ववैभवाचा पोकळ अभिमान धरून कर्तव्यशून्य होतात, तर कित्येक लोक नकळत झालेल्या अपराधाबद्दल

वाईट वाटून घेतात. पण पूर्वार्जित बऱ्यावाईट कर्मांचा विचार न करतां आपल्या उत्कर्षासाठीं दुसऱ्यांना त्रास न होईल असा प्रयत्न करा.

शुद्ध ज्ञान आणि सुयोग्य विवेक ह्यांच्या बळावर पुढील कर्मांच्या लोभापासूनही दूर राहा. अज्ञान आणि अविवेक ह्यांनीं केलेल्या कर्मांचें बंधन त्रासदायक असतें.

प्रारब्धं त्विह भुज्यताम्

आल्या तोंड सुखेंचि देउनि

पूर्वार्जित कर्माप्रमाणें आपणांस मिळालेल्या वस्तूंचा योग्य उपभोग घ्या. दुसऱ्यांच्या वैभवाला पाहून भुलूं नका. आलेल्या संकटांना तोंड द्या. "विपदि धैर्यम्।" संकटकाळीं धीरानें वागा. प्रारब्धकर्म भोगल्यावांचून गत्यंतर नाहीं हें लक्षांत ठेवा.

अथ परब्रह्मात्मना स्थीयताम् ॥५॥

करा नारायणा या नरा ॥ ५ ॥

ह्या जगांत अत्यंत दुर्लभ असलेल्या तीन वस्तूंपैकीं मनुष्यजन्म ही एक वस्तु आहे. चौऱ्यांशीं लक्ष योनींत फिरतां फिरतां केव्हां तरी पाप-पुण्य समान होऊन मनुष्यजन्म मिळतो. ह्यास्तव आपला व्यवसाय करीत असतांना विद्वानांच्या अगर गुरूंच्या आश्रयानें पूर्णब्रह्माचें – परमेश्वराचें – ज्ञान करून घ्या. आपला उत्कर्ष साधा. नांवलौकिक मिळवा. "मरावें परी कीर्तिरूपें उरावें" असें समर्थ रामदासस्वामींनीं सांगितलें आहे.

ईश्वरावर श्रद्धाभाव ठेवून जगांत शुद्ध मनानें सर्वांना अविरोध असा चांगला व शुद्ध व्यवहार करा.

यः श्लोकपञ्चकमिदं पठते मनुष्यः
संचिन्तयत्यनुदिनं स्थिरतामुपेत्य ।
तस्याशु संसृतिदवानलतीव्रघोर-
तापः प्रशान्तिमुपयाति चितिप्रसादात् ॥

जो विद्यार्थी अथवा मनुष्य ह्या पांच श्लोकांचें नित्य नियमानें पठण करून स्थिर मनानें व दृढ निश्चयानें ह्यांतील अर्थाचें मनन करील त्याचा वणव्याप्रमाणें भासणारा जगांतील तीव्र ताप ज्ञानरूपी परमेश्वराच्या कृपेनें शांत होतो.

नों. दि.

म. ग्रं. सं. वाचनालय ३२
१००९५ क्र.
सू. क्र.
वि. व्या०वा०

प्रार्थना

लेखे समाप्ते गुरुपादपद्मम्
नत्वा कृपामर्थयते जयाय।
जोशीकुले त्र्यम्बको नाम यस्य
'मोरेश्वरो' नाम हि तस्य पुत्रः ॥१॥

स्खलितं यत्प्रमादान्मे
तद्बुधाः क्षन्तुमर्हथ।
सन्तो गुणान् जिघृक्षन्ति
गुणगृह्यो हि सज्जनः ॥ २ ॥

करकृतमपराद्धं क्षन्तुमर्हन्ति सन्तः ॥

॥ इति शम् ॥

अनुक्रम ३३०२८
विभाग बा. वा.
क्रमांक ३०
नों. दि. २२/११/६२